MHAM020019562026

**आर.एम.जे.सी.नं.१००१/२०२६**
**उर्मिला सिसोदीया व इतर वि. कोणीही नाही**
**आदेश नि. क्र.१ वर**
**(दिनांक २३ जुलै, २०२६)**

अर्जदाराने प्रस्तुत **अर्ज बॉम्बे रेग्युलेशन** अॅक्ट **१८२७** मधील तरतुदीच्या अनुषंगाने वारसा प्रमाणपत्र जारी करण्याकरिता दाखल केला आहे.

२. अर्ज व अभिलेखावरील दस्तऐवजांचे अवलोकन केले. अर्जदारांचे विद्वान वकील श्री. के. व्ही. महाजन यांचा युक्तीवाद ऐकला. अर्जदार क्र.१ चे पती व अर्जदार क्र.२ चे वडिल मृतक नंदकिशोर लक्ष्मणप्रसाद सिसोदिया हे दि.१०.०७.२०२० रोजी प्रभात कॉलनी, कोल्हटकर नगर, शिलांगण रोड, अमरावती येथे मरण पावले. मृतक नंदकिशोर लक्ष्मणप्रसाद सिसोदिया यांची आई मृतक सरजुदेवी लक्ष्मणप्रसाद सिसोदीया ही दि.३१.१२.१९९८ रोजी मरण पावलेली आहे. करिता त्यांचे वारस म्हणून अर्जदार यांचा उल्लेख करण्यात आला आहे.

३. अर्जदाराने मृतक नंदकिशोर लक्ष्मणप्रसाद सिसोदिया व मृतक सरजुदेवी लक्ष्मणप्रसाद सिसोदीया यांच्या मृत्यु प्रमाणपत्रांची प्रत अभिलेखावर **नि.क्र.११ व १२** वर लावण्यात आली.

४. अर्जदार यांनी सदर अर्ज यांना मृतक नंदकिशोर लक्ष्मणप्रसाद सिसोदिया यांच्या मृत्यूनंतर लागणा–या शासकीय व निमशासकीय कामाकरिता वारसाप्रमाणपत्र मिळण्याकरिता हवा आहे. तसेच अर्जदारांव्यतिरिक्त मृतक नंदकिशोर लक्ष्मणप्रसाद सिसोदिया यांना कोणतेही वारस नाही. या न्यायालयाने त्यांच्या वारसांच्या आक्षेपाबद्दल सायटेशन नोटीस आणि वृत्तपत्रामध्ये आक्षेपाबद्दल नोटीस देण्याबाबत आदेश केला होता. ते नोटीस दैनिक विदर्भ मतदार दि.२९.०५.२०२६ रोजी प्रकाशित झाले. परंतु, आता पर्यंत कोणीही न्यायालयात येवून त्यांच्या वारसांवर आक्षेप घेतला नाही किंवा उजर केला नाही.

५. अर्जदार त्यांच्या कथनांच्या पृष्ठर्थ अर्जदाराने शपथेवर पुरावा नोंदविला.

अर्जदाराने त्यांची ओळख अधोरेखीत करण्याकरिता आधार ओळखपत्राची प्रत **नि.क्र.१३ व १४** वर अभिलेखावर लावली आहे. पुरावा व अभिलेखावरील दस्तऐवजाचे अवलोकन केले असता असे निदर्शनास येते की, अर्जदाराने मृतक नंदकिशोर लक्ष्मणप्रसाद सिसोदिया यांच्या वारसा दाव्याला आक्षेप मागविण्या करिता वृत्तपत्राव्दारे जाहीर नोटीस **नि.क्र.१५** वर प्रकाशित करण्यात आली. परंतु, अर्जदारांच्या अर्जावर अद्यापपर्यंत कोणी आक्षेप नोंदविला नाही. वरिल चर्चेचा सारासार विचार करता मी या निष्कर्षास आलो आहे की, मृतक नंदकिशोर लक्ष्मणप्रसाद सिसोदिया यांचे वारस असल्याची बाब सिध्द करण्याइतपत पुरावा अभिलेखावर आणलेला आहे. करिता खालील आदेश.

## आदेश

१. अर्ज मंजुर करण्यात आला आहे.

२. अर्जदार हे मृतक नंदकिशोर लक्ष्मणप्रसाद सिसोदिया यांचे वारस असल्याबाबत वारसा प्रमाणपत्र जारी करण्यात यावे.

**नोंद :– वरिल वारस प्रमाणपत्र फक्त शासकीय कार्यालयीन कामाकरिता उपयोगात आणता येईल.**

RAVI RAMDAS KHAMATKAR

Digitally signed by RAVI RAMDAS KHAMATKAR
Date: 2026.07.23 15:26:06 +0530

दिनांक २३/०७/२०२६

(रवि रा.खामतकर)
४ थे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,
अमरावती.

प्रमाणपत्र

प्रमाणीत करण्यात येते की, या पी. डी. एफ. फाईलमधील प्रत्येक शब्द हा मुळ आदेशाच्या प्रतीप्रमाणे बरोबर आहे

| | |
|---|---|
| लघुलेखकाचे नांव | - कु. एन.आर. पेटकर |
| न्यायालयाचे नांव | - श्री. रवि रा. खामतकर<br>४ थे सह दिवाणी न्यायालय क.स्तर, अमरावती |
| आदेश घोषित केल्याचा दिनांक | - २३/०७/२०२६ |
| पिठासीन अधिकारी यांनी सही केल्याचा दिनांक | - २३/०७/२०२६ |
| आदेश अपलोड दिनांक | - २३/०७/२०२६ |